# जाहीर नोटीस

तमाम विक्रेतेदार यांस याद्वारे कळविणेत येते की, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे निजीकक्षासाठी एक वातानुकुलीत यंत्र खरेदी करावयाचे आहे. याकरीता दरपत्रके मागविणेत येत आहेत.

## अटी व शर्ती

१) दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशिलासह, तारखेसहीत, बंद लखोटयामधून मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचे नांवे असावे. सदर लखोटयावर **" वातानुकुलीत यंत्र खरेदी करणेकरीता दरपत्रक"** असा उल्लेख करणेत यावा.

२) दरपत्रक सादर करणा–या विक्रेत्यांची वस्तू व सेवा करारांतर्गत नोंदणी असणे आवश्यक आहे.

३) दरपत्रकामध्ये SGST/CGST क्रमांक नमुद करावा. तसेच कार्यालयीन दस्तऐवजी तयार करणेसाठी दुकानाचे लायसन्स, पॅनकार्ड, आधारकार्ड,बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत व रद्द केलेला धनादेश दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

४) सदर वातानुकुलीत यंत्राचे स्टार रेटिंग ५ स्टार असावे तसेच उत्कृष्ट सुविधा असलेले उदा. विजेची बचत, सुरळीत चालण्याची क्षमता, खोलीतील तापमान आणि माणसांच्या संख्येनुसार कूलिंग क्षमता नियंत्रित करणे व इन्व्हर्टर तंत्रज्ञान असलेले इ. दरपत्रकात यंत्राबाबत सविस्तर वर्णन नमूद करावे. वस्तूच्या दर्जाबाबत खात्री विक्रेत्यांनी दयावयाची आहे.

५) खरेदी करणेत आलेले वातानुकुलीत यंत्र जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयात पोहोच करुन तो बसवून देणेची जबाबदारी संबंधित विक्रेत्यांची राहील.

६) जाहीर नोटीसीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

७) सर्वात कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

८) अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सिंधुदुर्ग यांचा राहील.

तरी, इच्छुक विक्रेत्यांनी आपली दरपत्रके **दि.०२/०६/२०२६ रोजी ६.०० वाजेपर्यंत** या कार्यालयाकडे सादर करावीत.

28/05/2026

दिनांकः– २८/०५/२०२६

सहाय्यक अधीक्षक(वित्त)
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग

प्रती



म.जा.क्र.ग्रंथा./३६६१ सन २०२६
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांकः–२८/०५/२०२६

प्रत माहितीसाठी व कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी सविनय सादर–

१. मा. दिवाणी न्यायाधीश(व.स्तर), सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
२. मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
३. मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
४. मा. दिवाणी न्यायाधीश(क.स्तर), कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी, मालवण, कणकवली, देवगड, दोडामार्ग (ई–मेल द्वारे)
५. मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
६. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग–ओरोस (ई–मेल द्वारे)
७. मा. जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग–ओरोस यांचे नोटीस बोर्डवर तसेच संकेतस्थळावर
८. डी.एस.ए. , जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग यांचेकडे जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता